**दि. २७.०७.२०२२**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, धुळे अंतर्गत शेतकरी पशुपालक यांच्यासाठी दहिवद, **शिरपूर जि. धुळे येथे रात्रीची कार्यशाळा संपन्न**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, धुळे आणि जयराम दहिवद वि.का.सोसायटी लि.दहिवद यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवसीय रात्रीची कार्यशाळा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय या विषयावरती प्रशिक्षण संपन्न. सदर कार्यशाळा डॉ.दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, धुळे यांचे अध्यक्षते मध्ये संपन्न झाली. प्रमुख उपस्थिती मध्ये श्री. नरेंद्र पाटील, अध्यक्ष, जयराम दहिवद वि.का.सोसायटी लि.दहिवद, मार्गदर्शक डॉ धनराज चौधरी, शास्त्रज्ञ, पशु संवर्धन व दुग्ध शास्त्र, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, डॉ.अतिश पाटील, शास्त्रज्ञ,मृद विज्ञान व कृषी रसायण शास्त्र, कृषी विज्ञान केंद्र, धुळे,  तसेच पशुपालक शेतकरी मोठ्या संखेने उपस्थित होते.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक श्री.नरेंद्र पाटील यांनी केले, प्रास्तविका मध्ये त्यांनी कार्यशाळेचे महत्व अधोरेखित करून शेतकरी उत्पन्न दुप्पट होण्यामध्ये पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय महत्व पूर्ण भूमिका बजावत आहे याचा उल्लेख करून माहिती दिली.

डॉ. धनराज चौधरी यांनी भारतीय अर्थव्यवस्थे मधील पशुधनाचे महत्व आणि भविष्यातील संधी या विषयी मार्गदर्शन केले तसेच जनावरांची काळजी, निगा, आहार व्यवस्थापन, चारा उत्पादन तंत्र या विषयी माहिती उपस्थितांना करून दिली.डॉ. अतिश पाटील यांनी पशुधन सोबत सेंद्रिय खत उत्पादन तंत्रज्ञान यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले.

अध्यक्ष मार्गदर्शना मध्ये डॉ.दिनेश नांद्रे यांनी पाशुसंगोपानातून शास्वत उत्पन्न कसे घेता येऊ शकते विषयी महत्मा फुले कृषी विद्यापीठ शिफारसित एकात्मिक शेती पध्दती मॉडेल याचे उदाहरण देऊन उपस्थिताना मार्गदर्शन केले तसेच कृषी विज्ञान केंद्र,धुळे राबवीत असलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली. सदर कार्यशाळेत शिरपूर, धुळे येथील पशुपालक  शेतकरी यांनी सहभाग नोंदवला.


शेतकरी पशुपालक प्रशिक्षण कार्यक्रम



